२२ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

# देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील स्त्री कर्तृत्वाचे योगदान

**भाग २**



Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

संपादक
डॉ. स्नेहल तावरे
डॉ. शिवलिंग मेनकुदळे
डॉ. संजय नगरकर
डॉ. सविता पाटील

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Scanned with OKEN Scanner

ॐ स्नेहवर्धन प्रकाशन : क्र. १३०१

ॐ देश आणि विदेशातील विविध क्षेत्रातील स्त्री कर्तृत्वाचे योगदान
भाग - २
(समीक्षा - संदर्भ)

ॐ प्रकाशक आणि मुद्रक
डॉ. एल.व्ही. तावरे
स्नेहवर्धन, ८६३ सदाशिव पेठ,
महात्मा फुले सभागृहामागे, पुणे ४११ ०३०
स्थिरसंवाद : (०२०) २४४७ २५ ४९ /२४४ ३६ ९६१
भ्रमणसंवाद : ९४२३६४३१३१/९०७५०८१८८८
ई मेल : snehaltawre@gmail.com

ॐ मुखपृष्ठ : संतोष धोंगडे

ॐ © S.R.I.

ॐ प्रथमावृत्ती : १५ डिसेंबर २०१९
२२ वी आंतरराष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद, पुणे

ॐ अक्षरजुळणी : सुनीता पारनेरकर, पुणे

ॐ मुद्रणस्थळ : स्मिता प्रिंटिंग प्रेस, पुणे

ॐ ISBN 978-93-87628-75-5

ॐ पृष्ठसंख्या : १७८

ॐ मूल्य : ₹ २५०
-$ 3

TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका
## भाग - २


| | | | |
|---|---|---|---|
| • | संपादकीय | - डॉ.स्नेहल तावरे<br>- डॉ. शिवलिंग मेनकुदळे<br>- डॉ. संजय नगरकर<br>- डॉ. सविता पाटील | .. ९ |
| १. | महान समाजसेविका : मदर तेरेसा | - डॉ. नागोबाराव भुरके | ..११ |
| २. | आनंदवनातील अनाथांची आई : साधनाताई आमटे | - डॉ. मधुकर पवार | ..१४ |
| ३. | स्वातंत्र्य चळवळीतील भारतीय महिलांचे योगदान | - डॉ. अंबादास मंजुळकर | ..१८ |
| ४. | स्थानिक शासनातील महिलांची भूमिका | - डॉ . राहुल पंडित | ..२२ |
| ५. | काव्यप्रांतातील मोहरांचा हंडा : बहिणाबाई चौधरी | - डॉ. पांडुरंग भोसले | ..२६ |
| ६. | श्रीमती ॲनी बेझंट : राजकीय व सामाजिक विचारातील योगदान | - डॉ . अशोक चोथे | ..३० |
| ७. | नजूबाई गावित (साहित्य क्षेत्र) | - डॉ. माहेश्वरी गावित | ..३३ |
| ८. | थोर महिला मार्गारेट थॅचर (१९२५-२०१३) | - डॉ.मालिनी वडतकर | ..३७ |
| ९. | बंडखोर लेखिका : ताराबाई शिंदे | - डॉ. सीमा नाईक-गोसावी | ..४१ |


TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

Scanned with OKEN Scanner

# बंडखोर लेखिका - ताराबाई शिंदे

**- डॉ. सीमा नाईक-गोसावी**

महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या चळवळींचा विचार व लेखनाचा मोठा प्रभाव 'स्त्री-पुरुष तुलना' या निबंधावर जाणवतो. 'स्त्री-पुरुष समान आहेत,' 'स्त्रियाही माणूस आहेत' असा 'माणूसकेंद्री विचार' या निबंधाचा गाभा आहे. ताराबाई शिंदे या अत्यंत बुद्धिमान व सुंदर होत्याच पण स्वाभिमानी व न्यायी होत्या. त्यांना शास्त्र अभ्यासाशिवाय मराठी, हिंदी, उर्दू, इंग्रजी, संस्कृत व गुजराथी भाषा अवगत होत्या. लहानपणापासून सत्यशोधकी विचार-वारसा वातावरणामुळे ताराबाई सामान्य स्त्रियांपेक्षा धीट होत्या. बुलढाण्यासारख्या गावात त्या घोड्यावरून फिरत. आपल्या शिक्षणाचा फायदा समाजाला व्हावा, हा ताराबाईंचा आग्रह होता. ताराबाईंनी स्त्रियांच्या धाडसाबद्दल, कर्तृत्त्वाबद्दल खूप लिहिले आहे. स्त्रिया पुरुषांना सतत धीर देतात. संसाराचा अर्धा भार उचलतात सांभाळून घेतात. कठीण प्रसंगावर मात करण्याचे आत्मबळ देतात. अत्यंत विचारपूर्वकतेने स्त्रियांच्या आर्थिक सहकार्यामुळे पुरुष परिस्थितीशी सामना करू शकतात. अशी स्त्रियांची मदत पुरुषांनी मान्य केली पाहिजे असा आग्रह ताराबाईंनी धरला आहे.

ताराबाई शिंदे यांची भाषाशैली आक्रमक आहे. मुर्दाड समाजाला भानावर आणण्यासाठी त्या परखड, निर्भयपणे पुरुषी वर्चस्वाचा समाचार घेतात. आपले म्हणणे मांडताना त्या कोणाची भीडभाड ठेवत नाहीत. त्यांनी पुरुषवर्गावर घेतलेले आक्षेप व त्या आक्षेपांची शहानिशा याचे वाचन करताना आपण मनात स्वत:ला तपासायला लागतो कुटुंबात व समाजात स्त्रीला असलेले स्थान कसे असावे? याची नेमकी दखल ताराबाई शिंदे यांनी १५० वर्षांपूर्वी घेतली होती. हे त्यांच्या भूमिकेचे वेगळेपण आहे. स्त्री-पुरुष समानतेविषयी आपले म्हणणे त्या ठामपणे मांडतात. भाषेवर त्यांचे प्रभुत्व जाणवते. 'स्त्रिया आणि पुरुष' यात साहसी कोण? हे स्पष्ट करून दाखविण्याकरिता हा निबंध - अशी पुस्तकांची भलावण मुखपृष्ठावर केली आहे. सडेतोडपणा, स्त्रियांविषयीची कणव आणि जित्याजागत्या माणसांवरील प्रेम असे अनेक गुण त्यांच्या या निबंध लेखनात जाणवत राहतात. पुरुषी वर्चस्वावर, पुरुषसत्ताक वर्तनावर त्या कमालीच्या तुटून



TULJARAM CHATURCHAND COLLEGE * BARAMATI
Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati
Scanned with OKEN Scanner

पडतात. त्यांच्या आक्षेपांची उत्तरे आजही १५० वर्षानंतर शोधताना आपण मनातल्या मनात पराभूत होतो आणि हेच त्यांच्या बंडखोर लेखनाचे यश आहे.

ताराबाई शिंदे यांनी हा निबंध लिहिल्यानंतर साधारणपणे १०० वर्षांनंतर त्याची चर्चा होते. हा निबंध स्त्री स्वातंत्र्याची बूज राखणारा निबंध आहे. समतातत्त्वाची बांधणी करणारा विचार आहे. ताराबाई शिंदे ज्या मराठा समाजात त्याकाळी जन्माला आल्या त्या समाजात फार गौरवाची वागणूक स्त्रियांना दिली जात होती अशातला भाग नाही. १५० वर्षापूर्वी स्त्रियांचे क्षेत्र चूल-मूल यापलीकडे गेलेले नव्हते. अशा कुंठीत व संकोचशील वातावरणात ताराबाईंनी इतका प्रगत व परिवर्तनीय विचारांचा निबंध लिहून स्वत: तो विचार आचरणात आणला. एक स्त्री म्हणून त्यांचे लेखन खूप मोठी झेप घेणारे आहे. हे लेखन म्हणूनच प्रेरणादायी ठरते हेच त्यांचे वेगळेपण आहे.

ताराबाई शिंदे यांनी या निबंधात पुरुषवर्गाचे कपटी कावे अर्थात ढोंगबाजी, दांभिकता यांवर स्पष्टपणे कोरडे ओढले आहेत. त्या म्हणतात "अरे, कपटात तर पहिला नंबर तुमचा, तुमचे कपट किती वर्णावे, पावलोपावली प्रत्यय येतो अहा रे, काय काय सोंगे घेऊन, अंगावर पिवळे, काळे पट्टे ओढून पटाईत वाघ बनता रे ! अरे गोसावी, फकीर, नानक, कानफाटे, जोगी, जटाधारी नंगे बनून सर्व त्याग करून रानोरान अंगास भस्म फासून व डोकीस जटा वाढवून हे सर्व जग कपटानेंच भोंदीत फिरता ना? 'हे कोण तर रामगीरबुवा, हे कोण शास्त्रीबुवा, हे कोण गणपतबुवा, बुवा मंत्रदायिक आहेत' हे इतके एकाने म्हटले म्हणजे पुरे पंचपक्कानांचा खुराक खाऊन बोक्यासारखे एकदा ताजे बनतात नी मग बुवाने देवदेवतार्जन बखळीत पडून बुवा जितक्या बायका दर्शनाला येतील तितक्यातून ज्या काही निवडक नवयौवना असतील त्याचे चिंतन करीत, 'हे सुंदरी हे सुंदरी' अशी माळ फेरीत बसतात, मग गेले ! 'शिवहरे' नाही ना काही नाही हा राधारूपी शिंवहरी बुवाचे मुखात बसतो. नेत्रात या नुतन केतकीचे सुहास्य मुख व अंतरयामी दामाजीचा निजध्यास लागून बुवा धड वेडे ना धड शहाणे होऊन जातात."[२]

एकूणच ताराबाईंनी तत्कालीन अंधश्रद्धा, बुवाबाजी स्त्रियांचे शोषण करणारी व्यवस्था, ढोंगीपणा या सर्वांवर कठोर प्रहार केले आहेत व भोंदूगिरीवर प्रखर भाष्य करून अंधश्रद्ध लोकांच्या डोळ्यात अंजन घातले आहे.

'स्त्री-पुरुष तुलना' हा निबंध स्त्रियांवर अकारण लावण्यात आलेल्या दोषारोपांचा प्रतिवाद करणारा वस्तुनिष्ठ विचार आहे. ताराबाईंना वैज्ञानिक प्रगती व धावणाऱ्या रेल्वेचे कौतुक वाटत असे. जे दोष स्त्रियांच्या अंगी आहेत तेच पुरुषांच्या अंगी नाहीत काय? "लबाडी करणे, चोरी शिदळकी, खून, दरोडे, दगाबाजी, सरकारी पैसा, लाच खाणे, खऱ्याचे खोटे, खोट्याचे खरे करणे, यांतून एकही अवगुण पुरुषांत नाही काय?" असा सरळ प्रश्न ताराबाई विचारतात.

ताराबाई शिंदे यांची लेखनशैली प्रखर, तप्त व धगधगती आहे. नवरा-



Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

Scanned with OKEN Scanner

बायकोच्या नात्यातील खोटेपणा, कृत्रिमता त्यांनी उघड केला आहे. त्या भांडण करत नाहीत. पण हक्कासाठी ठाम भूमिका घेताना दिसतात. स्त्रियांना खूप मोकळीक - अमर्याद स्वातंत्र्य असावे असेही त्यांचे म्हणणे नाही. बायको नवऱ्याला देवाप्रमाणे मानते तर नवऱ्याची वागणूकही देवाप्रमाणे पाहिजे. ताराबाईंनी अनेक ठिकाणी धारदार शब्दात प्रश्न विचारले आहेत त्या म्हणतात, ''सावित्री जर पतीचे प्राण परत आणण्यासाठी यमदरबारात गेली असेल असे उदा. पुराणकथांमध्ये आहे. पण पुरुषांमध्ये असे उदाहरण ...? की पुरुष त्या दरबाराच्या वाटेवर तरी गेलाय का? असे ऐकण्यात तरी आलेय का?'' प्रस्तुत निबंधात स्त्री-प्रतिमांच्या विविध बाजूंवर प्रकाश टाकलेला आहे. रूढ प्रमाणात असलेल्या प्रतिमांचा त्या त्यांच्या शब्दात छडा लावतात. भर्तृहरीच्या त्रिशतकातल्या एका श्लोकात स्त्रियांवर लावण्यात आलेल्या सर्व दोषांचा प्रतिवाद आपल्या निबंधात त्यांनी केला आहे जसे की - स्त्रिया म्हणजे जारण मारण यंत्र, संशय परिभ्रमाचा भोवरा, उद्धटपणाचे माहेरघर, अविचारकर्माचे नगर, सकलदोषांचे निधान, कपटीपणाची खाण, दुर्गणांचे उत्पत्तीस्थान, मोक्षमार्गातील धोंड या प्रत्येक दोषारोपांचे त्या खंडन करतात आणि पुरुषांनाच हे दोष कसे लागू पडतात हे ताराबाई पटवून देतात.

स्त्रियांबाबतीतील सामाजिक अनिष्ट रूढी-प्रथा, स्त्रीधर्म म्हणजे कोणता? स्त्रियांना खावा लागणारा मार, 'प्रतिव्रता' या शब्दाची शहानिशा, पुराणातल्या स्त्रीप्रतिमा, पुरुषांची फसवेगिरी, स्त्रीचे बटकीप्रमाणे राबणे, पुरुषांचे पुनर्विवाहावरही भेदक भाष्य, केशवपन, अनिष्ठ प्रथा, विवाहित स्त्रियांची अवहेलना, पुरुषांचे स्वार्थासाठी कपटी कावे, कुरूप, दुर्गुणी, घाणेरडी वागणूक इ. वर प्रखर भाष्य केलेले आहे. साधु-बुवा भोंदुगिरीवरही कडाडून हल्ला चढविला आहे. संन्यासदीक्षा घेणाऱ्या साधूंवरही त्यांच्या शुचिर्भूतपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. शुचिर्भुत होऊन श्रीभागीरथीच्या चिरेबंदी घाटावर स्नान करून दोन-दोन शेर विभूती फासून - जप करीत बसणाऱ्या बुवांवर त्या चिडून लिहितात -

'बाहयवेश मिरवी भगवा हे ॥<br>
अंतरी कुमतिंचे भग वाहे ॥'

''हे कुणाला दिसते? दक्षिणेचे पैसे साचवून कुकर्म करायचे, इतके कृत्य करून महाराज संन्याशी''[३] स्त्रियांना शिक्षण मिळालेले नसल्याने त्या अविचाराला बळी पडून कधी-कधी फसतात व स्वत:चाच जीव गमावून बसतात उदा. मूल न होणे, स्त्रीचरित्रातील पुराणातील संदर्भही स्त्रीच्या बाजूने नाहीत यावरही चरित्र लेखकाच्या भूमिकेचा त्या समाचार घेतात.

ताराबाई शिंदे यांचा लेखणीचा सूर धीटपणाचा, धाडसीपणाचाच आहे. स्त्रियांनाही काही सल्ले त्यांनी दिले आहेत. स्त्रियांनी आपली मने विवेकाच्या

Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati
TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI



Scanned with OKEN Scanner

खांबास बांधून घ्यावीत. सदाचरणाने वागावे म्हणजे सुखच सुख मिळेल इच्छा त्यांनी व्यक्त केली आहे. ताराबाई शिंदे यांच्या लेखनात ... आहे. शतकानंतरही हा निबंध विचारप्रवृत्त करायला लावतो. ... मोठेपण आहे या निबंधाला जागतिक दर्जाचे मोल प्राप्त झालेले ... या निबंधात उपस्थित केलेले प्रश्न सुटलेले व संपलेले नाहीत. ... भाषेत १५० वर्षापूर्वी समताधिष्ठित विचारांचा ध्वज फडकत ठेवणा... शिंदे यांचा अभिमान बाळगावा एवढे नैतिक अधिष्ठान या निबंधास प्राप्त ... आहे. 'स्त्री-पुरुष तुलना' करून नैतिकतेच्या तुल्यबळ सूत्रात सर्व जीवन... ताराबाई शिंदे यांनी बांधले आहेत व आदर्श आचरणाचा वस्तुपाठ या निबंधा... रूपाने आपल्यासमोर शतकापूर्वी ठेवला आहे. हेच या निबंधाचे वेगळेपण आहे.


**संदर्भ ग्रंथ -**

१. स्त्री प्रश्नांची वाटचाल - डॉ. विद्युत भागवत, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, ८ मार्च २००४, पृ. ४०
२. स्त्री पुरुष तुलना - ताराबाई शिंदे, प्रस्तावना पुरुषोत्तम खेडेकर, जिजाई प्रकाशन, पुणे, प्रथम प्रकाशन जानेवारी १८८२, बुलढाणा, पुनर्मुद्रण १२ एप्रिल १९९४, अमरावती, पृ. ३३.
३. स्त्री-पुरुष तुलना, ताराबाई शिंदे, जिजाई प्रकाशन पुणे, प्रथम प्रकाशन, जानेवारी १८८२, बुलढाणा, पुनर्मुद्रण १२ एप्रिल १९९४, द्वितीय पुनर्मुद्रण २८ नोव्हेंबर २००७, १९ फेब्रुवारी २०११, पृ. ३४
४. श्रीमती ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना, संपादक - नागनाथ कोत्तापल्ले, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, दुसरी आवृत्ती, १९९२
५. ताराबाई शिंदे लिखित स्त्री-पुरुष तुलना, संपादक - विलास खोले, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती १९९७
६. कै. ताराबाई शिंदेकृत स्त्री-पुरुष तुलना, संपादक - डॉ. स. गं. मालशे, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, तिसरी आवृत्ती, १९९०
७. स्त्री-अस्मितेचा आविष्कार: एकोणिसावे शतक, मृणालिनी जोगळेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पहिली आवृत्ती, १९९१
८. उगवले नारायण (लोकगीते-स्त्रीगीते), संपादक - इंद्रजित भालेराव, प्रतिभास प्रकाशन, परभणी, पहिली आवृत्ती, १९९६
९. लीळाचरित्र (म्हाइमभट्टकृत महानुभावीय ग्रंथ), संपादक- डॉ. वि. भि. कोलते, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, पहिली आवृत्ती, १९७८
१०. महात्मा फुले समग्र वाङ्मय, संपादक - य. दि. फडके, हरी नरके, महाराष्ट्र राज्य आणि संस्कृती मंडळ.



Principal
Tuljaram Chaturchand College
Baramati

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI





Scanned with OKEN Scanner